ePaper शिंदे गटामुळे अडचणी वाढताहेत, अजितदादा गटाची अमित शाहांकडे तक्रार?

| वर्ष - 7 | अंक - 186 | UDYAM-MH-26-0158827 |





महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- भारताचा 160 धावांनी विजय
- भावा-बहिणीनं एकत्र पहावा सिनेमा!
- ओबीसींच्या मतांकडे भाजपाचे लक्ष
- अजित पवारांना ताप आहे की मनस्ताप


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 13 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# दप्तर दिरंगाई भोवली!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत उपअभियंता, कनिष्ठ अभियंता निलंबित

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जागेच्या खासगी वाटाघाटीसंदर्भात आठ आठवड्यात योग्य तो निर्णय घेऊन एक आठवड्यात याचिकाकर्त्याला माहिती द्यावी, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेला दिले होते. या आदेशाचे पालन न केल्यामुळे याचिकाकर्त्यांने न्यायालयात अवमान याचिका दाखल केली. याप्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी स्थापत्य विभागाच्या एक कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंत्यावर सेवा निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेत निलेश सोमा दाते हे स्थापत्य विभागात (PCMC)कनिष्ठ अभियंता तर राजकुमार वसंतराव सुर्यवंशी हे उप अभियंता म्हणून कार्यरत आहेत. महापालिकेने कासारवाडी येथे खासगी वाटाघाटीव्दारे जागा घेतली होती. मात्र, या वाटाघाटीच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

याचिकेवरील सुनावणीमध्ये न्यायालयाने भूसंपादनाबाबत आठ आठवड्यात योग्य तो निर्णय घ्या. या निर्णयाची याचिकाकर्त्यांना एक आठवड्यात माहिती द्यावी, असे आदेश न्यायालयाने महापालिकेला दिले होते. न्यायालयाच्या या निर्णयानंतर मुदतीत प्रस्ताव ठेवून कार्यवाही करण्याची जबाबदारी दाते आणि सुर्यवंशी यांची होती.

मात्र, त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी न्यायालयात अवमान याचिका दाखल केली. त्यानंतर पालिकेने दाते आणि सुर्यवंशी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागितला..

### खातेनिहाय चौकशीचे आयुक्तांचे आदेश

त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्याचे पालिकेच्या लक्षात आले. या दोघांनी वेळीच कार्यवाही केली असती तर पालिकेच्या विरोधात अवमान याचिका दाखल झाली नसती. त्यामुळे कर्तव्यात कसूर केल्याबद्दल दाते व सुर्यवंशी यांचे सेवानिलंबन करून खातेनिहाय चौकशी करावी, असा आदेश आयुक्त सिंह यांनी जारी केला आहे.

# प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाईचा दंडुका!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून 3 दिवसांत 30 लाख दंड वसूल

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वायुप्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे बांधकाम व्यावसायिक, कचरा जाळणारे, हवेचे प्रदूषण करणाऱ्यांविरोधात महापालिकेने**





पिंपरी : वायुप्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे बांधकाम व्यावसायिक, कचरा जाळणारे, हवेचे प्रदूषण करणाऱ्यांविरोधात महापालिकेने कारवाईचा दंडुका उगारला आहे. तीन दिवसांत ३० लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वायुप्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने ३२ प्रभागांमध्ये १६ वायुप्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकाम स्थळांना भेट देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्यांची नोंद घेण्यात येत आहे. या दरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. नोटीस देऊन कामाची जागा लाखबंद (सील) केली जात आहे.

> वायुप्रदूषण नियंत्रण पथकाकडून विविध जागांची पाहणी करण्यात येत आहे. वायुप्रदूषण रोखण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे.
>
> **-संजय कुलकर्णी,**
> सह शहर अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# ऐन दिवाळीत चोरट्यांचा धुमाकूळ; वडगाव शेरीत सदनिका फोडल्या

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

ऐन दिवाळीत वडगाव शेरी भागात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. एका सोसायटीतील तीन सदनिकांचा दरवाजा उचकटून ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. याच सोसायटीतील आणखी दोन सदनिकांचे कुलुप उचकटून चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. या बाबत प्रसाद शेळके (रा. गणेश रेसीडन्सी, वडगाव शेरी ) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिवाळीनिमित्त शेळके त्यांच्या मूळगावी गेले आहेत. चोरट्यांनी शेळके, तसेच शेजारी असलेल्या दोन सदनिकांचे कुलूप तोडून रोकड आणि दागिने चोरले. तीन सदनिकांमधून चोरट्यांनी दोन लाख सात हजार रुपयांचा ऐवज लांबविला.

गणेश रेसिडन्सी सोसायटीपासून काही अंतरावर असलेल्या जय विहार अपार्टमेंटमधील रहिवासी सोमेश कुलकर्णी आणि सूरज हगवणे यांच्या सदनिकांचे कुलुप चोरट्यांनी उचकटण्याचा प्रयत्न केला. पोलीस उपनिरीक्षक अरविंद कुमरे तपास करत आहेत. दिवाळीत अनेकजण मूळगावी जातात. चोरटे सोसायटीतील बंद सदनिकांची पाहणी करून चोरी करतात. ज्या सोसायटीत सीसीटीव्ही कॅमेरे, तसेच रखवालदार नाहीत, अशा सोसायट्यांमधील सदनिकांचे कुलुप तोडून ऐवज चोरून पसार होतात, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# 19 कोटींची शिष्यवृत्ती वितरित!

## » पाचवी-आठवीतील 32 हजार 667 विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील पाचवी-आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील ३२ हजार ६६७ शिष्यवृत्तीधारकांना शिष्यवृत्तीची रक्कम नवीन दराने वितरित करण्यात आली. यंदा शिष्यवृत्तीसाठी ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक असून, राज्य शासनाकडून मिळालेल्या १९ कोटी रुपयांचा निधी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आला.**

राज्यात पाचवीसाठी १६ हजार ६८३, तर आठवीसाठी १६ हजार २५८ विद्यार्थी संचसंख्या आहे. पाचवीच्या परीक्षेतून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या आणि पुढे सहावी ते आठवी शिक्षण घेणाऱ्या एकूण ५० हजार ४९ विद्यार्थ्यांना, तर आठवीच्या परीक्षेत शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या ३२,५१६ विद्यार्थ्यांना नववी आणि दहावीला शिष्यवृत्ती दिली जाते. गेल्यावर्षीपर्यंत पाचवीला कमाल एक हजार रुपये, आठवीला दीड हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत होती. मात्र, यंदापासून शिष्यवृत्तीची रक्कम वाढवून पाचवीला पाच हजार रुपये, आठवीला ७ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यामुळे यंदापासून वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये एकूण ४० कोटी ४० लाख फक्त रुपये शिष्यवृत्तीसाठी मंजूर आहेत. तर २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणासाठी रक्कम ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक आहेत.



त्यापैकी नुकताच शासनस्तरावरुन १९ कोटी ३९ लाख १९ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे सातवी, आठवी आणि दहावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यावर वाढीव दराने शिष्यवृत्ती पहिल्यांदाच वितरित करण्यात येत असल्याचे योजना विभागाचे उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी सांगितले. परीक्षेतून गुणवत्तेच्या आधारे शिष्यवृत्तीधारक ठरल्यानंतर योजना शिक्षण संचालनालयाकडून शिष्यवृत्तीचे वितरण विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर केले जात आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती प्राप्त होत नसल्याने शिष्यवृत्ती वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. २०२१ पर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम न मिळालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचेकडे द्यावी, ही माहिती www. eduonlinescholarship. com या संकेतस्थळावर गटशिक्षणाधिकारी यांचेकडून अद्ययावत झाल्यावर संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा करण्यात येईल. तर २०२१ नंतरच्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती संबंधित शाळेने परीक्षा परिषदेच्या www. mscepune.in या संकेतस्थळावर शाळा लॉगीनद्वारे अचूकपणे भरणे आवश्यक आहे. त्यासाठी शिष्यवृत्तीधारकांनी शाळेच्या मुख्याध्यापकाकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

उर्वरित विद्यार्थ्यांना नवीन दराने शिष्यवृत्ती वितरित करण्यासाठी आवश्यक निधीची राज्य शासनाकडे मागणी केली आहे. निधी प्राप्त होताच उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती वितरण करण्यात येईल.

### वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण

» यंदापासून वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये एकूण ४० कोटी ४० लाख फक्त रुपये शिष्यवृत्तीसाठी मंजूर आहेत. तर २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणासाठी रक्कम ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक आहेत. त्यापैकी नुकताच शासनस्तरावरुन १९ कोटी ३९ लाख १९ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे सातवी, आठवी आणि दहावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यावर वाढीव दराने शिष्यवृत्ती पहिल्यांदाच वितरित करण्यात येत असल्याचे योजना विभागाचे उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी सांगितले. परीक्षेतून गुणवत्तेच्या आधारे शिष्यवृत्तीधारक ठरल्यानंतर योजना शिक्षण संचालनालयाकडून शिष्यवृत्तीचे वितरण विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर केले जात आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती प्राप्त होत नसल्याने शिष्यवृत्ती वितरणात अडचणी निर्माण होत आहेत.

# जेजुरीत आज सोमवती अमावास्या यात्रा

## » भेसळयुक्त भंडारा विकणाऱ्यांवर होणार कारवाई

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा देवाची सोमवती यात्रा सोमवारी (१३ नोव्हेंबर) भरणार असून, खंडोबा गडातून देवाचा पालखी सोहळा सकाळी सात वाजता प्रस्थान ठेवणार आहे. दुपारी साडेबारा वाजता पवित्र कऱ्हा नदीवर श्री खंडोबा म्हाळसादेवीच्या मूर्तींना धार्मिक वातावरणात स्नान घालण्यात येणार आहे.**



सोमवती अमावास्येच्या नियोजनासाठी होळकरांच्या छत्री मंदिर परिसरात खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ मंडळाची बैठक झाली. मुख्य इनामदार राजेंद्र पेशवे यांनी देवाची स्वारी सकाळी सात वाजता निघणार असल्याचे या वेळी जाहीर केले. रविवारी (१२ नोव्हेंबर) दुपारी तीन वाजता अमावास्या सुरू होत असून, सोमवारी दुपारी अडीचपर्यंत अमावास्येचा कालावधी आहे. त्यामुळे जेजुरीत सोमवती यात्रेला मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

पुरंदरचे तहसीलदार विक्रम रजपूत, देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपटराव खोमणे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, अभिजित देवकाते, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, संतोष खोमणे, छबन कुदळे, अशोक खोमणे, कृष्णा कुदळे, सुधीर गोडसे, अजिंक्य देशमुख, व्यवस्थापक राजेंद्र जगताप बैठकीस उपस्थित होते. पालखी सोहळ्यातील भाविकांना चहा, पाणी आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली असून, पालखी मार्गाच्या पायऱ्यांवरील अतिक्रमण काढण्यात येणार आहे, असे पोपटराव खोमणे यांनी सांगितले. मागील सोमवती यात्रेत खंडोबा गडावर पालखी उतरताना अपघात होऊन सहा जण जखमी झाले होते. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊ नये यासाठी विशेष काळजी घेण्यात येत आहे.

पालखीला खांदा देणाऱ्या खांदेकऱ्यांना वेगळा पोषाख देण्यात आला आहे. १३०० खांदेकऱ्यांना अशा पद्धतीचे टी-शर्ट दिले असून त्यांच्या व्यतिरिक्त इतरांना खांदा देता येणार नाही असे ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी सांगितले.

### भेसळयुक्त भंडारा विकणाऱ्यांवर कारवाई

» सोमवती यात्रेच्या निमित्ताने जेजुरीत मोठ्या प्रमाणात भंडारा-खोबऱ्याची विक्री होते. भंडाऱ्याला मागणी भरपूर असल्याने काही बाहेरील व्यापारी यात्रेत भेसळयुक्त भंडारा विक्रीसाठी आणतात. हा भंडारा बनावट असून, त्यामध्ये विविध रसायनांचा वापर केला जातो. पालखी सोहळा सुरू झाल्यावर शेकडो पोती भंडाऱ्याची उधळण केली जाते. या भेसळयुक्त भंडाऱ्यावर बंदी घालण्याची मागणी ग्रामस्थ मंडळाने केली होती. या भंडाऱ्याचा भाविकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याने कोणीही बनावट भंडारा विकू नये. विक्री केल्यास कडक कारवाई केली जाईल, अशा नोटिसा भंडार-खोबरे विक्रेत्यांना देण्यात आल्याची माहिती जेजुरीचे पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर यांनी दिली.

# रसायनयुक्त पाणी पवना नदी सोडणाऱ्या ड्रायक्लिनर्स कंपनी विरोधात गुन्हा दाखल!

## » नदी प्रदूषण करणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास कारवाई करण्यात येणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केजूदेवी बंधारा थेरगाव येथे मागील काही दिवसांपासून पवना नदीमध्ये पांढऱ्या रंगाचा फेस तयार होवून दुर्गंधी येत आहे.**




या अनुषंगाने पर्यावरण व जलनि:सारण विभागाच्या वतीने ताथवडे भागात सर्वेक्षण करत असताना असे आढळून आले की, ताथवडे येथील २४ क्लेन (मेसर्स क्लेनफॅब सर्विसेस एल. एल. पी) या ड्रायक्लिनर्सच्या कंपनीने ड्रायक्लिन करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायनयुक्त पाणी प्रक्रिया न करता महापालिकेच्या जलनि:सारण नलिकेस विना परवाना जोडले होते. सदर रसायनयुक्त पाणी हे काळपट निळसर व फेसयुक्त होते.

सदर ड्रायक्लिन कंपनीच्या मालकावर वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची कारवाई ही जलनि:सारण व पर्यावरण विभागाचे अधिकारी तसेच आरोग्य निरिक्षक अमोल गोरखे, गोरक्षनाथ करपे, कनिष्ठ अभियंता संदिप पाडवी, सचिन मगर यांच्या वतीने करण्यात आली.

### यापुढेही कारवाई चालू राहणार

» यापुढेही अशी कारवाई चालू राहणार असून अशा प्रकारच्या नदी प्रदूषण करणा-या व्यक्ती आढळून आल्यास त्यांचे विरूद्ध कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी देखील असे आढळून आल्यास महापालिकेस त्वरित कळवावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# लक्ष्मी पुजनानंतर शहरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

दरवर्षीप्रमाणे कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील अमावास्येला देशभरात दिवाळीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. असे मानले जाते की देवी लक्ष्मीला स्वच्छता आवडते आणि देवी लक्ष्मी फक्त स्वच्छ ठिकाणीच वास करते. त्यामुळे दिवाळीत लक्ष्मीपूजनाचा विशेष.विधी असतो.

या दिवशी संध्याकाळी आणि रात्रीच्या शुभ मुहूर्तावर देवी लक्ष्मी, विघ्नांचा नाश करणाऱ्या गणेश आणि माता सरस्वतीची पूजा केली जाते. त्यानुसार काल संध्याकाळी शुभ मुहूर्तावर 05:28 ते 8:07 या कालावधीत शहरात घरोघरी व कामाच्या ठिकाणी लक्ष्मी देवीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ठिकठिकाणी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

पुराणानुसार कार्तिक अमावस्येच्या काळ्या रात्री महालक्ष्मी स्वतः पृथ्वीवर येऊन प्रत्येक घरी भेट देते. या काळात प्रत्येक प्रकारे स्वच्छ आणि उजळलेल्या घरात ती अर्धवट अवस्थेत राहते, म्हणून दिवाळीच्या दिवशी स्वच्छता करून विधीनुसार पूजा केल्यास माता महालक्ष्मीचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो. असा विचार आहे.

काल संध्याकाळी 05:28 ते 8:07 या कालावधीत लक्ष्मी पूजनाचा पहिला मुहार्त होता या मुहर्तावर शहरात घरोघरी व व्यवसायाच्या ठिकाणी लक्ष्मी पूजन करण्यात आले. या नंतर मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

# दिवाळी वंचितांची... सामाजिक जाणीवांची..! : निराधारांची दिवाळी केली गोड!

## » चिंचवडमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा विधायक उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरात दिवाळी उत्साहात साजरी होत असतानाच समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आणि वंचित घटकांचीही दिवाळी गोड व्हावी. या करिता राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पुढाकाराने "दिवाळी वंचितांची... सामाजिक जाणीवांची..!" असा विधायक उपक्रम शहरभरात राबवण्यात आला.**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे, कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे आदीसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमाचे शहरातील सामाजिक संस्थांकडून कौतूक होत आहे.

शहराध्यक्ष शेखर काटे म्हणाले की, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, पिंपरी-चिंचवडच्या पुढाकाराने यावर्षी दिवाळी वंचित घटकांसोबत साजरी करण्याचा उपक्रम हाती घेतला. या माध्यमातून रस्त्यावर, वस्त्यांवर बेघर असलेल्या आणि निराधार नागरिकांना आणि परिस्थितीमुळे संघर्षमय जीवन जगणाऱ्या लहान मुलांसोबत आम्ही दिवाळी सण साजरा केला. प्रवाहापासून दूर असलेल्या लोकांच्या जीवनात क्षणभर जरी आनंदाचा प्रकाश आपण निर्माण करु शकलो, तर जीवन सार्थ ठरले, अशी भावना आहे.



### वंचित घटकांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न

» पिंपरी-चिंचवडमधील निगडी, पिंपरी, कासारवाडी, डांगे चौक, निगडी, भोसरी आदी विविध ठिकाणी युवक राष्ट्रवादीतर्फे हा उपक्रम दिपावलीच्या निमित्ताने राबवण्यात आला. वंचित घटकांची दिवाळी गोड करण्याचा छोटा प्रयत्न निश्चितच दिवाळी विधायकपद्धतीने साजरा केल्याचे समधान देणारा आहे. समाजातील वंचित घटकांच्या सुख-दु:खात राष्ट्रवादी युवक कायम सहभागी असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहील, असा विश्वास आहे, असेही शेखर काटे यांनी म्हटले आहे.




# या शिशिरानंतर प्रतीक्षा वसंताची!

**सगळेचजण अर्थतज्ज्ञ होऊ पहात आहेत. बँकांचेही अर्थतज्ज्ञ असतात. या सगळ्या अर्थतज्ज्ञांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवला तर, भारताच्या अर्थव्यवस्थेत किंवा तिच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत काहीही चुकीचे चाललेले नाही. आणि त्यांच्या दृष्टीने खरे सांगायचे तर, तिच्या बाबतीत काहीही चुकीचे होऊदेखील शकत नाही.**



बँक अर्थतज्ज्ञांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवायचा तर रिझर्व्ह बँक म्हणजे स्वर्ग आहे आणि भारताच्या अर्थव्यवस्थेचे एकदम उत्तम चालले आहे. (अर्थात जोपर्यंत रिझर्व्ह बँक याविरोधात इशारा देत नाही, तोपर्यंत). ते जितके एकनिष्ठ आहेत, तितकेच सत्यवादी असायला हवेत, असे आपले मला बापडय़ाला वाटते. १ ऑक्टोबर, २०२३ रोजी, विद्यमान सरकारची शेवटची सहामाही सुरू झाली आहे. ३० मे २०२४ रोजी या सरकारची दुसरी टर्म भरेल आणि सरकारला दहा वर्षे पूर्ण होतील. एप्रिल आणि मे २०२४ हे दोन महिने सरकारला आभासी सुट्टी असेल. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेण्याची ही योग्य वेळ आहे. भारतासारख्या विकसनशील देशात, उत्पादनवाढीचा दर हा इतर कोणत्याही आकडेवारीपेक्षा महत्त्वाचा असतो. कारण त्यातून अर्थव्यवस्थेची स्थिती समजत असते. त्यामुळे भाजपच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीतील विकासदराने सुरुवात करू या. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या आकडेवारीनुसार, पहिल्या नऊ वर्षांत सरासरी वाढीचा दर ५.७ टक्के होता.

सरकारच्या अंदाजानुसार २०२३-२४ मध्ये उत्पादनवाढ ६.५ टक्के असेल, तर दहा वर्षांची सरासरी ५.८ टक्के भरेल. या टक्केवारीची तुलना यूपीआय -१ आणि यूपीआय -२ दरम्यान साधल्या गेलेल्या विकास दरांशी करा. यूपीआय -१ च्या पाच वर्षांची सरासरी ८.५ टक्के होती आणि यूपीआय -१ आणि यूपीआय -२ च्या दहा वर्षांची सरासरी ७.५ टक्के होती. काही अर्थतज्ज्ञ विद्यमान सरकारची घसरण फार महत्त्वाची नाही, असे म्हणू शकतात. पण तसे म्हणणे पूर्णपणे चुकीचे असेल. कारण या घसरणीने राष्ट्रीय सुरक्षा, पायाभूत सुविधांवरील खर्च, गुंतवणूक, रोजगार निर्मिती, कल्याणकारी उपाय, घरगुती वापर, बचत, गरिबी कमी करणे आणि शिक्षण आणि आरोग्यातील सुधारणांवर गंभीर परिणाम केला आहे. सामान्य लोकांसमोर महागाई आणि बेरोजगारी या दोन मुख्य चिंता आहेत. श्रीमंत कुटुंबे किंवा अगदी १० टक्के कुटुंबे वगळता बाकी सगळय़ांनाच या वाढत्या महागाईत रोजचा ताळमेळ बसवणे अवघड जात आहे. २०१३-१४ मध्ये अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांक (नवीन मालिका) ११२ वर होता तो डिसेंबर २०२२ मध्ये १७४ वर पोहोचला आहे. अन्नधान्य महागाई १० टक्क्यांच्या आसपास आहे. याचा तात्काळ परिणाम म्हणजे घरगुती पातळीवर त्यांचा वापर कमी झाला आहे. त्यामुळे लोक खर्च करताना हात आखडता घेत आहेत किंवा त्यांच्या बचतीमधले पैसे वापरून खर्चाची गरज भागवत आहेत. कुटुंबांची निव्वळ आर्थिक मालमत्ता ५.१ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. ग्राहकोपयोगी वस्तू विकणाऱ्या कंपन्यांनी आपली विश्वासार्हता (ब्रॅण्ड लॉयल्टी) टिकवून ठेवण्यासाठी त्याच किमतीची छोटी पॅकेजेस विकायला सुरुवात केली आहे. दुचाकी वाहनांची विक्री घटल्याची आकडेवारी पुढे आली आहे. दरवाढीच्या घरगुती वापरावर होणाऱ्या परिणामाचे हे प्रतीक म्हणता येईल.

दुसरी प्रमुख चिंता म्हणजे बेरोजगारी. भरपूर रोजगार निर्माण केल्याचे दावे केले जात असले तरी त्यानुसार गेल्या १० वर्षांत लाखो नोकऱ्या निर्माण झालेल्या नाहीत आणि आश्वासन दिले गेले होते, त्यानुसार वर्षाला दोन कोटी नोकऱ्याही लोकांना मिळालेल्या नाहीत. आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, गेल्या १० वर्षांतील एक वर्ष वगळता बाकी प्रत्येक वर्षी, बेरोजगारीचा दर सात टक्क्यांच्यावर आहे. स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालानुसार पदवीधरांमधील बेरोजगारीचा दर ४२ टक्के आहे. २०२२ मध्ये तरुणांमधील बेरोजगारीचा दर (१५-२४ वर्षे) २३.२२ टक्के होता. आज सर्वाधिक 'रोजगार' हा स्वयंरोजगार (५७ टक्के) आहे. नियमित वेतनावरील कर्मचाऱ्यांचे प्रमाण २४ टक्क्यांवरून २१ टक्क्यांवर घसरले आहे.

## संपादकीय »

# ऋषींची 'गृह'शोभा!

***आपल्या कर्तव्याशी इमान राखणारी असली की काय होते याचा अत्यंत कटू धडा इंग्लंडच्या गृहमंत्री सुएला ब्रेव्हरमन यांस मिळाला असून याची किंमत त्यांस कदाचित मंत्रिपदातूनही द्यावी लागेल.***

नोकरशाही खऱ्या अर्थी स्वायत्त, ताठ कण्याची तसेच आपल्या कर्तव्याशी इमान राखणारी असली की काय होते याचा अत्यंत कटू धडा इंग्लंडच्या गृहमंत्री सुएला ब्रेव्हरमन यांस मिळाला असून याची किंमत त्यांस कदाचित मंत्रिपदातूनही द्यावी लागेल. या सुएलाबाई भारतीय वंशाच्या आहेत आणि त्यांनी लंडन पोलिसांस दमात घेण्याचा प्रयत्न केला याचा अर्थाअर्थी काही संबंध नसेलही. पण त्यांनी जे केले त्यामुळे भारतीय वंशाचेच असलेले पंतप्रधान ऋषी सुनक हे चांगलेच संकटात सापडले असून या दोन भारत-वंशीय नेत्यांमुळे सत्ताधारी हुजूरपक्षीय टीकेचे धनी होताना दिसतात. तेथे जे झाले आणि होत आहे ते सरकारी स्वायत्त यंत्रणांतील कर्मचाऱ्यांनी आपली बांधिलकी सत्ताधाऱ्यांशी नाही; तर जनतेशी आहे हे भान सतत कसे राखायचे असते याचा उत्तम धडा आहे. विचारी जनांनी जे घडले ते समजून घेणे आवश्यक.

**दुष्काळी परिस्थिती निर्माण होणं कुणाच्या हातात नसतं. पण त्या दुष्काळाचे परिणाम कमीत कमी होतील अशीं धोरणं आखणं आणि ती कृतीत आणणं तर सरकारला शक्य आहे ना? राज्यात सिंचनाच्या इतक्या योजना राबवूनही उन्हाळा सुरू व्हायच्या आधीच गावोगावी पाण्याच्या टँकरच्या वाऱ्या का सुरू होतात? महाराष्ट्राकडून प्रेरणा घेऊन इतर राज्ये जलसंवर्धन करू लागली, रब्बी पिकं घेऊ लागली, पण आपण मात्र कोरडे पाषाणच, असं का?**

# राज्यात दुष्काळ तर जाहीर झाला..

दुष्काळ जाहीर करण्यासाठीच्या नियमावली आणि निकषांप्रमाणे ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळी तालुक्यात सरकारच्या काय सवलती असणार हेही जाहीर झालं आहे. महाराष्ट्रातला ना दुष्काळ नवीन आणि ना त्यावरचे उपाय नवीन. सगळे तेच. काहीच वेगळं घडत नाही. राज्याने मंडळ पातळीवर दुष्काळाचे निकष लावून पाहिले तर याहून अधिक गावं या वर्षीच्या दुष्काळात समाविष्ट होतील. दरवर्षी कुठे ना कुठे कमी पाऊस/अति पाऊस/ आठ-दहा दिवस पूर्ण कोरडं/कमी अवधीत अतिवृष्टी/ तपमान वाढ किंवा तपमान कमी या अशा निसर्गाच्या लहरीवरच कोरडवाहू शेती वर्षांनुवर्ष चालू आहे. कमी होत जाणारी उत्पादकता आणि निसर्गातील बदलांचे तीव्र झालेले चढउतार याने पिचलेला कोरडवाहू शेतकरी या सगळय़ामुळे आणखीनच खचून जात आहे. महाराष्ट्रातील जनतेने पहिला प्रश्न विचारायला पाहिजे तो असा की,



दुष्काळी परिस्थिती कोणाच्या हातात नाही, पण त्याचे विपरीत परिणाम कमी करण्याचे धोरण अशक्य आहे का? खरं तर तसं ते कधीच नव्हतं. मुद्दा असा आहे की प्रत्येक दुष्काळाच्या वर्षी चारा छावण्या, पाण्याचे टँकर यावर जेवढा खर्च होतो त्यापेक्षा कमी निधी वापरून दुष्काळावर कायमस्वरूपी योजना शक्य नाही का? उदाहरणार्थ, गावोगावी स्थानिक चारा प्रजातीचं संगोपन, संवर्धन करणं, जंगलातल्या चाऱ्याचं उत्पादन वाढवणे हे शक्य नाही का? चारा छावण्यांबाबत जी तत्परता आहे ती कुरण व्यवस्थापनाबाबत का नसावी? दुसरा प्रश्न पिण्याचं पाणी. एखाद्या वर्षी नेहमीपेक्षा थोडा कमी पाऊस झाला तरी लगेच पाणीकपातीची चर्चा सुरू होते. टँकरने सुरू होणाऱ्या पाणीपुरवठय़ाची आकडेवारी समोर येते. टँकरभोवती किंवा विहिरीभोवती जमलेल्या गावकऱ्यांचे फोटो दाखवून याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू होते. हे असं घडण्यात काही लाजिरवाणं आहे असं आपल्याला का नाही वाटत? पाणलोट विकासाचा रस्ता महाराष्ट्राने दाखवला, इतर राज्यांतील गावच्या गावं पिण्याचं पाणीच नव्हे तर या पद्धतीने पाण्याचं संवर्धन करून रब्बी शेतीदेखील करायला लागली. पण आपण मात्र पाणलोटात यशस्वी झालेल्या फक्त एक आणि दोन लहान गावांची (ती गावं ग्रामपंचायत असलेलीदेखील नाहीत) नावं घेण्यात समाधान मानतो.

इथंसुद्धा टँकरवरचा खर्च आणि जलसंवर्धनाचा खर्च यांत तफावत आहेच. असंही लक्षात घ्यायला हवं की चारा छावणी आणि टँकरवरचा खर्च हा प्रत्यक्षात काही 'निर्माण' करत नाही. तो निव्वळ खर्च आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजित पवारांना ताप आहे की मनस्ताप

## उद्धव ठाकरेंच्या टीकेला हसन मुश्रीफ यांचं प्रत्युत्तर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ताप आहे की मनस्ताप असं म्हणत टीका केली. यावरून अजित पवार गटातील मंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रत्युत्तर दिलं. “अजित पवार हे तोंडावर बोलणारे व्यक्ती आहेत, ते नाटक करणारी व्यक्ती नाही,” असं मत हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केलं. तसेच ते म्हणजे अजित पवार आत एक आणि बाहेर एक असं करणारे नाहीत, असंही नमूद केलं. ते रविवारी (१२ नोव्हेंबर) कोल्हापूरमध्ये पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलत होते.**



हसन मुश्रीफ म्हणाले, “अजित पवार हे तोंडावर बोलणारे व्यक्ती आहेत, ते नाटक करणारी व्यक्ती नाही. त्यांनी आयुष्यात कधीही नाटक केलं नाही. त्यांना खरोखर डेंग्यू झाला होता. आम्ही स्वतः दोन तीन वेळा त्यांच्या देवगिरी बंगल्यावर बैठका घेतल्या. त्यावेळी ते आजारी होते. त्यांच्या प्लेटलेट्स (पेशी) कमी होत होत्या. आता पेशी वाढत आहेत, पण अशक्तपणा आहे.” “अजित पवारांचा आवाज जवळून ऐकला, तर तो आवाज बसलेला होता हे लक्षात येईल. मला वाटतं आता ते व्यवस्थित झालेले असतील. अजित पवारांचं एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे अजित पवार आत एक आणि बाहेर एक असं करणारे नाहीत. सरळ तोंडावर सांगणारे निर्भिड व्यक्ती आहेत,” असं मत हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केलं. खोट्या प्रतिज्ञापत्रांवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवार गटावर सडकून टीका केली. त्याला प्रत्युत्तर देताना हसन मुश्रीफ म्हणाले, “झोमॅटो असो, स्विगी असो, आमच्या पक्षात त्या प्रत्येक कामगारांचा विभाग आहे.

त्यामुळे आमच्या पक्षाकडून ते प्रतिज्ञापत्र दाखल केले असतील. प्रतिज्ञापत्र खरी आहेत की खोटी हे ठरवण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला पक्षाला नाही. ते निवडणूक आयोग ठरवेल.” “अशाचप्रकारच्या तक्रारी मागीलवेळी शिवसेना प्रकरणातही झाल्या होत्या. त्यावेळी कोल्हापुरात चौकशी पथक आलं होतं. ते पथक याबाबतची चौकशी करून गेलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचा आहे. पक्षचिन्ह घड्याळ आमचंच राहणार आहे. ग्रामपंचायत निवडणूक निकालावरून पक्ष कुणाचा आहे हे सर्वांच्या लक्षात आलं असेल,” असंही हसन मुश्रीफ यांनी नमूद केलं. शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षचिन्ह कुणाचं यावरून केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी सुरू आहे. अशातच खोट्या प्रतिज्ञापत्रांवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवार गटावर सडकून टीका केली. त्याला वैद्यकीय शिक्षणमंत्री व अजित पवार गटातील नेते हसन मुश्रीफ यांनी प्रत्युत्तर दिलं. ते रविवारी (१२ नोव्हेंबर) कोल्हापूरमध्ये पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बोलत होते. हसन मुश्रीफ म्हणाले, “झोमॅटो असो, स्विगी असो, आमच्या पक्षात त्या प्रत्येक कामगारांचा विभाग आहे. त्यामुळे आमच्या पक्षाकडून ते प्रतिज्ञापत्र दाखल केले असतील. प्रतिज्ञापत्र खरी आहेत की खोटी हे ठरवण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला पक्षाला नाही. ते निवडणूक आयोग ठरवेल. “अशाचप्रकारच्या तक्रारी मागीलवेळी शिवसेना प्रकरणातही झाल्या होत्या. आमच्या पक्षाकडून ते प्रतिज्ञापत्र दाखल केले असतील. प्रतिज्ञापत्र खरी आहेत की खोटी हे ठरवण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला पक्षाला नाही. ते निवडणूक आयोग ठरवेल.” “अशाचप्रकारच्या तक्रारी मागीलवेळी शिवसेना प्रकरणातही झाल्या होत्या. त्यावेळी कोल्हापुरात चौकशी पथक आलं होतं. ते पथक याबाबतची चौकशी करून गेलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचा आहे. पक्षचिन्ह घड्याळ आमचंच राहणार आहे. ग्रामपंचायत निवडणूक निकालावरून पक्ष कुणाचा आहे हे सर्वांच्या लक्षात आलं असेल,” असंही हसन मुश्रीफ यांनी नमूद केलं.

### अजित पवार नाटक करणारी व्यक्ती नाही

» हसन मुश्रीफ म्हणाले, “अजित पवार हे तोंडावर बोलणारे व्यक्ती आहेत, ते नाटक करणारी व्यक्ती नाही. त्यांनी आयुष्यात कधीही नाटक केलं नाही. त्यांना खरोखर डेंग्यू झाला होता. आम्ही स्वतः दोन तीन वेळा त्यांच्या देवगिरी बंगल्यावर बैठका घेतल्या. त्यावेळी ते आजारी होते. त्यांच्या प्लेटलेट्स (पेशी) कमी होत होत्या. आता पेशी वाढत आहेत, पण अशक्तपणा आहे. अजित पवारांचा आवाज जवळून ऐकला, तर तो आवाज बसलेला होता हे लक्षात येईल. मला वाटतं आता ते व्यवस्थित झालेले असतील. अजित पवारांचं एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे अजित पवार आत एक आणि बाहेर एक असं करणारे नाहीत. सरळ तोंडावर सांगणारे निर्भिड व्यक्ती आहेत.

# एकादशीला विठ्ठलाची पूजा कोण करणार?

## शासकीय पूजेचा मान उपमुख्यमंत्र्यांना द्यावा : सुप्रिया सुळे

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आषाढी एकादशीप्रमाणे कार्तिक एकादशीनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात भक्तांची मांदियाळी असते. आषाढी एकादशीला राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नी विठ्ठलाची शासकीय पूजा करतात. तर कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ही शासकीय पूजा केली जाते.**



गेल्या वर्षी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी कार्तिकी एकादशीला विठ्ठलाची पूजा केली होती. परंतु, यंदा राज्यात दोन उपमुख्यमंत्री (देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार) आहेत. त्यामुळे यंदा शासकीय पूजेचा मान कोणत्या उपमुख्यमंत्र्यांना द्यावा असा पेच विठ्ठल मंदिर समितीसमोर निर्माण झाला आहे. तसेच कोणते उपमुख्यमंत्री कार्तिकीनिमित्त विठ्ठलाची पूजा करणार असा प्रश्न राज्यातल्या जनतेलाही पडला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंदिर समितीसमोर असलेल्या पेचावर भाष्य केलं आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, कोणी पूजा करावी, याबद्दल मला काही माहिती नाही. माझ्या मनात आणि माझ्या ओठांवर नेहमी ‘राम कृष्ण हरी’ हेच शब्द असतात. मी ‘राम कृष्ण हरी’चा जप करणारी आहे. आपण सगळे वारकरी आहोत, सगळे शेतकरी आहोत. आपलं फक्त ‘हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा’ एवढंच असतं. कार्तिकीनिमित्त शासकीय पूजेचा मान कोणत्या उपमुख्यमंत्र्यांना द्यावा यासंदर्भात मंदिर समितीची बैठक झाली. या बैठकीनंतर मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, २३ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी असून पहाटे २.२० वाजता उपमुख्यमंत्री आणि मानाचे वारकरी यांच्या हस्ते श्रींची शासकीय पूजा केली जाणार आहे.

### आपण सगळे वारकरी आहोत

» राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंदिर समितीसमोर असलेल्या पेचावर भाष्य केलं आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, कोणी पूजा करावी, याबद्दल मला काही माहिती नाही. माझ्या मनात आणि माझ्या ओठांवर नेहमी ‘राम कृष्ण हरी’ हेच शब्द असतात. मी ‘राम कृष्ण हरी’चा जप करणारी आहे. आपण सगळे वारकरी आहोत, सगळे शेतकरी आहोत. आपलं फक्त ‘हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा’ एवढंच असतं. कार्तिकीनिमित्त शासकीय पूजेचा मान कोणत्या उपमुख्यमंत्र्यांना द्यावा यासंदर्भात मंदिर समितीची बैठक झाली.

# ओबीसींच्या मतांकडे भाजपाचे लक्ष

## मध्य प्रदेश : भाजपाने प्रसिद्ध केला जाहीरनामा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेशमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. येथे प्रचार शिगेला पोहोचला असून भाजपा आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष निवडणूक जिंकण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करत आहेत. दरम्यान, आपली सत्ता कायम राखण्यासाठी यावेळी भाजपाने महिला मतदारांकडे विशेष लक्ष दिले आहे. मध्य प्रदेश निवडणुकीसाठी भाजपाने नुकतेच आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात भाजपाने महिला तसेच तरुणांना आकर्षक आश्वासने दिली आहेत.**



भाजपाने नुकतेच ९६ पानांचे संकल्प पत्र जाहीर केले आहे. हे संकल्प पत्र प्रसिद्ध करताना भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय मंत्री प्रल्हाद पटेल, ज्योतिरादित्य सिंधिया, अश्विनी वैष्णव आदी नेते उपस्थित होते. आपल्या या जाहीरनाम्यात भाजपाने दारिद्र्य रेषेखाली असलेल्या कुटुंबातील महिलांना मोफत शिक्षण दिले जाईल, असे आश्वासन दिले. यात बालवाडी ते पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या शिक्षणाचा समावेश आहे. यासह लाडली बहणा योजना तसेच केंद्राच्या उज्वला योजनेच्या लाभार्थी महिलांना घरगुती गॅस सिलिंडर फक्त ४५० रुपयांना दिला जाईल, असे आश्वासन दिले. काँग्रेसने महिलांना प्रतिमहिना १५०० रुपयांची आर्थिक मदत तसेच ५०० रुपयांना गॅस सिलिंडर देण्याचे आश्वासन दिलेले आहे. शिवराजसिंह चौहान यांच्या लाडली लक्ष्मी योजनेप्रमाणाचे काँग्रेसनेदेखील मेरी बिटिया राणी योजनेअंतर्गत मुलींना जन्मापासून ते लग्नापर्यंत २.५१ लाख रुपये दिले जातील, असे आश्वासन दिलेले आहे. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांना अस्मानी आणि सुलतानी संकटांना तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळे भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांनादेखील अनेक आश्वासनं दिली आहेत.

गव्हाला प्रति क्विंटल २७०० रुपये तर तांदळाला प्रति क्विंटल ३१०० रुपये हमीभाव दिला जाईल, असे आश्वासन दिले आहे. तर दुसरीकडे काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात गव्हाला २६०० रुपये तर तांदळाला प्रति क्विंटल २५०० रुपये हमीभाव देण्याचे आश्वासन दिले आहे. तांदळाच्या बाबतीत हा हमीभाव नंतर ३००० रुपयांपर्यंत वाढवला जाईल, असेही आश्वासन काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात दिलेले आहे. भाजपाने मध्य प्रदेशमधील नागरिकांना १०० रुपयांत १०० यूनिट्स वीज देण्यात येईल असे सांगितले आहे. काँग्रेसने ओबीसी मतदारांकडे विशेष लक्ष दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात ओबीसी समाजासाठी वेगवेगळी आश्वासने दिली आहेत. यामध्ये जातीआधारित जनगणना, ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्यासाठी येणाऱ्या सर्व अडचणी दूर केल्या जातील, अशा आश्वासनांचा समावेश आहे. तर भाजपानेदेखील ओबीसी समाजाला आकर्षित करण्यासाठी वेगवेगळी आश्वासने दिली आहेत. यात विशिष्ट काळात (कालबद्ध) ओबीसी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाईल, ओबीसी समाजातील मुलांना स्पर्धा परीक्षांचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल.

भव्य लव-कूश मंदीर उभारले जाईल. तसेच ग्वालियरमध्ये धर्मशाळा उभारली जाईल, अशी आश्वासनं दिली आहेत. मध्य प्रदेशमध्ये आदिवासी समाजाचे प्रमाणही लक्षणीय आहे. त्यामुळे आदिवासी समाजाची मते मिळावीत यासाठी भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात आदिवासी केंद्रित काही आश्वासनं दिली आहेत. आदिवासींच्या विकासासाठी ३ लाख कोटी रुपये खर्च केले जातील, असे भाजपाने म्हटले आहे. भाजपाने तरुणांना आकर्षित करण्यासाठीदेखील अनेक आश्वासनं दिली आहेत. आयआयटीप्रमाणेच मध्य प्रदेशमध्ये प्रत्येक विभागात 'मध्य प्रदेश इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' तसेच एम्स रुग्णालयाप्रमाणे 'मध्य प्रदेश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स' रुग्णालयाची स्थापना केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. राज्यात 'अटल मेडिसिटी' नावाने एक मेडिकल सिटी उभारण्याचेही भाजपाने आश्वासन दिले आहे.

### तरुणांना प्रतिमहिना तीन हजार

» भाजपाने नुकतेच ९६ पानांचे संकल्प पत्र जाहीर केले आहे. हे संकल्प पत्र प्रसिद्ध करताना भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय मंत्री प्रल्हाद पटेल, ज्योतिरादित्य सिंधिया, अश्विनी वैष्णव आदी नेते उपस्थित होते. आपल्या या जाहीरनाम्यात भाजपाने दारिद्र्य रेषेखाली असलेल्या कुटुंबातील महिलांना मोफत शिक्षण दिले जाईल, असे आश्वासन दिले. तर दुसरीकडे काँग्रेसने तरुणांना आकर्षित करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटर, बेरोजगारांना प्रतिमहिना १५०० ते ३००० रुपयांची आर्थिक मदत, सरकारी दोन लाख रिक्त जागा भरण्यात येतील तसेच ग्रामीण भागात नव्या १ लाख जागांची निर्मिती केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.


# पंतप्रधान मोदींकडून सैनिकांबरोबर दिवाळी साजरी!

## हा क्षण समाधान आणि आनंद देणारा आहे : पंतप्रधान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेशमध्ये जाऊन भारतीय सैनिकांबरोबर दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी सैनिकांच्या पराक्रमाचं कौतुक केलं. "प्रत्येकाला आपल्या कुटुंबाची आठवण येते," अशी भावना मोदींनी व्यक्त केली. तसेच जेथे सैनिक तेथेच माझा सण असंही नमूद केलं. ते रविवारी (१२ नोव्हेंबर) हिमाचल प्रदेशमधील लेपचा येथे सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करताना बोलत होते.**





नरेंद्र मोदी म्हणाले, "भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा हा उद्घोष आहे. दिवाळी हा पृथ्वीवरील पवित्र सण आहे. हा फार मोठा योगायोग आहे. माझ्यासाठी हा क्षण समाधान आणि आनंद देणारा आहे. हा क्षण माझ्यासाठी, तुमच्यासाठी आणि देशवासीयांना दिवाळीचा नवा प्रकाश देईल, असा मला विश्वास आहे. कुटुंबाची आठवण प्रत्येकाला येते. मात्र, भारतीय सैनिकांच्या चेहऱ्यावर अजिबात उदासपणा जाणवत नाही. सैनिकांच्या उत्साहात अजिबात कमतरता दिसत नाही. तुमच्यात उत्साह आणि उर्जा भरलेली आहे. कारण तुम्हाला १४० कोटी जनतेचं कुटुंब तुमचंच आहे हे माहिती आहे. संपूर्ण देश यासाठी सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो," असं मत नरेंद्र मोदींनी व्यक्त केलं. "माझ्यासाठी जेथे भारताचे सैनिक तैनात आहेत ती जागा कोणत्याही मंदिरापेक्षा कमी नाही. जेथे सैनिक, तेथे माझा सण आहे. आपल्या सैनिकांकडे या वीर वसुंधरेचा वारसा कायम राहिला आहे. त्यामुळेच सैनिकांनी अनेक पराक्रम केलं. आपल्या जीवाची पर्वा न करता सैनिक कायम देशरक्षणासाठी पुढे जात राहिले. आपल्या सैनिकांनी हे कायम सिद्ध केलंय की, सीमेवर सैनिक देशाची सर्वात मजबूत भिंत आहे," असंही मोदींनी नमूद केलं.

### जेथे सैनिक, तेथे माझा सण

» कुटुंबाची आठवण प्रत्येकाला येते. मात्र, भारतीय सैनिकांच्या चेहऱ्यावर अजिबात उदासपणा जाणवत नाही. सैनिकांच्या उत्साहात अजिबात कमतरता दिसत नाही. तुमच्यात उत्साह आणि उर्जा भरलेली आहे. कारण तुम्हाला १४० कोटी जनतेचं कुटुंब तुमचंच आहे हे माहिती आहे. संपूर्ण देश यासाठी सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो," असं मत नरेंद्र मोदींनी व्यक्त केलं. "माझ्यासाठी जेथे भारताचे सैनिक तैनात आहेत ती जागा कोणत्याही मंदिरापेक्षा कमी नाही. जेथे सैनिक, तेथे माझा सण आहे. आपल्या सैनिकांकडे या वीर वसुंधरेचा वारसा कायम राहिला आहे. त्यामुळेच सैनिकांनी अनेक पराक्रम केलं. आपल्या जीवाची पर्वा न करता सैनिक कायम देशरक्षणासाठी पुढे जात राहिले.

# 'टायगर-3' चित्रपटाला पायरसीचा फटका!



अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) यांचा मोस्ट अवेटेड 'टायगर 3' (TIGER 3) हा चित्रपट आज (12 नोव्हेंबर) चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचं अनेक जण कौतुक करत आहेत. या चित्रपटामधील ॲक्शन सीन्सचे देखील अनेकांनी कौतुक करत आहेत. अशातच आता 'टायगर 3' या चित्रपटाला पायरसीचा फटका बसला आहे. हा चित्रपट ऑनलाईन लीक झाला. सकाळी 6 वाजता थिएटरमध्ये टायगर-3 या चित्रपटाचा पहिला शो सुरू झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पण दरम्यान हा चित्रपट ऑनलाईन लीक झाला आहे. इंडिया डॉट कॉमच्या वृत्तानुसार, रिलीज झाल्यानंतर काही तासांतच हा चित्रपट पायरसीचा बळी ठरला आहे. टायगर 3 हा चित्रपट अनेक साइट्सवरुन फ्री डाउनलोड केला जात आहे. MOVIERULZ, FILMYZILLA, KUTTYMOVIES, TAMILROCKERS, FILMYWAP, PAGALWORLD, FILMYMEET, 7STARHD, VEGAMOVIES आणि MOVIESFLIX सारख्या साइटवर हा चित्रपट उपलब्ध आहे. टायगर 3 हा ऑनलाईन लीक झाल्यानंतर आता याचा परिणाम या चित्रपटाच्या कमाईवर होऊ शकतो, असा अंदाज लावला जात आहे. सलमान खाननं टायगर 3 हा चित्रपट रिलीज होण्याआधी चाहत्यांना चित्रपटाचे स्पॉयलर्स न देण्याची विनंती केली होती. "स्पॉयलर चित्रपट पाहण्याचा अनुभव खराब करू शकतात. आम्हाला आशा आहे की, टायगर-3 ही आमच्याकडून तुमच्यासाठी दिवाळीची परिपूर्ण भेट ठरेल." अशी पोस्ट सोशल मीडियावर शेअर करुन सलमाननं चाहत्यांना विनंती केली. टायगर 3 चित्रपटाचे दिग्दर्शन मनीष शर्मा यांनी केले आहे. हा YRF च्या स्पाय युनिव्हर्सचा एक भाग आहे. हा चित्रपट पहिल्याच दिवशी जवळपास 40 कोटींची कमाई करेल, असं म्हटलं जात आहे. सलमान खान आणि कतरिना कैफ यांच्या ॲक्शन सीन्सशिवाय या चित्रपटात शाहरुख खान आणि हृतिक रोशनचा कॅमिओ देखील आहे.

# अनुष्काचा आनंद गगनात मावेना!

भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली सध्याच्या वर्ल्डकपमध्ये केवळ धावाच करत नाही, तर आता त्याने गोलंदाजी मध्ये देखील चमक दाखवून दिली आहे . नेदरलँड्सविरुद्धच्या ४५व्या आणि शेवटच्या साखळी सामन्यात त्यान विकेट घेतली. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात कर्णधार रोहित शर्माने विराटला गोलंदाजीसाठी बोलावले. कोहलीने नेदरलँडचा कर्णधार स्कॉट एडवर्डसला बाद केले. त्याची विकेट घेताच स्टँड्समध्ये बसलेली त्याची पत्नी अनुष्का शर्मा चांगलीच खुश झाल्याचे पाहायला मिळाले. रोहितने २३ वे षटक टाकण्यासाठी कोहलीला बोलावले. विराटने पहिल्याच षटकात सात धावा दिल्या. यानंतर, त्याने डावाच्या 25व्या आणि त्याच्या दुसऱ्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर विकेट घेतली. कोहलीने एडवर्ड्सला केएल राहुलकडे झेलबाद केले. विराटची विकेट घेताच अनुष्काने आनंद गगनात मावेना, विराटने विकेट घेतल्यानंतरचा तीचा व्हिडीओ समोर आला आहे. विराट कोहलीने २०१४ नंतर प्रथमच वनडेत विकेट घेतली आहे. गेल्या वेळी त्याने वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडविरुद्ध ब्रेंडन मॅक्युलमला बाद केले होते. त्याला वनडेत पाचवे यश मिळाले आहे. वर्ल्डकपमध्ये त्याने प्रथमच विकेट घेतली आहे. यापूर्वी मॅचमध्ये विराटने फलंदाजीतही चमकदार कामगिरी केली. त्याने ५६ चेंडूत ५१ धावा केल्या. कोहलीने आपल्या खेळीत पाच चौकार आणि एक षटकार लगावला. त्यांच्याशिवाय श्रेयस अय्यरने नाबाद १२८ आणि केएल राहुलने १०२ धावा केल्या. रोहित शर्मांने ६१ धावांची तर शुभमन गिलने ५१ धावांची खेळी केली. टीम इंडियाने नेदरलँड्सविरुद्ध ५० षटकांत चार विकेट गमावत ४१० धावा केल्या.

# बिपाशाची लेक झाली एक वर्षाची!



बॉलीवूडची सर्वात लोकप्रिय अभिनेत्री बिपाशा बासू ही सध्या तिची लाडकी लेक देवीसोबत वेळ घालवत आहे. बिपाशानं सध्या चित्रपटातून ब्रेक घेतला असला तरी ती सोशल मिडियावर कमालीची सक्रिय आहे. बिपाशा तिच्या लेकीसोबत वेळ घालवत आहे. बिपाशा आणि करणची लेक देवी आज एक वर्षाची झाली आहे. त्यामुळे आज बिपाशा तिच्या लाडक्या देवीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे. लग्नाच्या पाच वर्षांनी हे दोघे आई-वडील झाले. गेल्या वर्षी 12 नोव्हेंबर रोजी बिपाशा आणि करण सिंग ग्रोवरने मुलीचे स्वागत केले. आता बिपाशा लेकीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे. बिपाशानं तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर मुलगी देवीच्या प्री-बर्थडे सेलिब्रेशनचा एक सुंदर व्हिडिओ शेअर केला होता. ज्यामध्ये देवी तिच्या वाढदिवसाचा केक कापताना दिसत होती. आता बिपाशाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर देवीच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त एक खास फोटो शेअर करत लांबलचक नोट लिहिली आहे. प्रसूतीनंतर लगेच काढलेल्या या फोटोत बिपाशा बेशुद्ध अवस्थेत तिच्या मुलीसोबत दिसत आहे. तर करण सिंग ग्रोव्हर तिला किस करताना दिसत आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये बिपाशा लिहिते की, "जन्माची जादू... आईच्या गर्भात 9 महिने आणि आता देवी एक वर्षाची आहे. हा काळ आयुष्यातील

# उर्फीचा पुन्हा अतरंगी लूक

अतरंगी फॅशनमुळे नेहमी चर्चेत असते. उर्फी ही अनेक वेळा हटके लूकमध्ये एअरपोर्टवर स्पॉट होते. नुकताच उर्फीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमधील उर्फीच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. उर्फीच्या या व्हायरल व्हिडीओला कमेंट करुन अनेक नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं आहे. व्हाईट कलरचा आऊटफिट आणि डोक्यावर व्हाईट टोपी अशा लूकमध्ये उर्फी एअरपोर्टवर स्पॉट झाली. उर्फीनं तिचा या लूकचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओच्या बॅकग्राऊंडला लेके प्रभू का नाम हे सलमान खानच्या टायगर-3 या चित्रपटामधील गाणं ऐकू येत आहे. उर्फीनं शेअर केलेल्या या व्हिडीओला कमेंट करुन अनेक नेटकऱ्यांनी उर्फीला तिच्या आऊटफिटमुळे ट्रोल केलं. उर्फीनं शेअर केलेल्या व्हिडीओला एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "या कपड्यांमध्ये ती प्रवास कसा करेल?". तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "सारखं विमानतळावर कशाला जाता मॅडम? तेही अशा कपड्यात." काही दिवसांपूर्वी उर्फीचा आणखी एक एअरपोर्टवरील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये ती एअरपोर्टवर एका व्यक्तीसोबत वाद घालताना दिसली. एअरपोर्टवरील व्हिडीओमध्ये एक व्यक्ती उर्फीला म्हणतो, 'देशाचं नाव खराब करत आहेस' त्यानंतर उर्फी त्या व्यक्तीला म्हणते, 'आपके बाप का कुछ जा रहा है? नहीं जा रहा ना तो जाओ अपना काम करो.' उर्फीनं ही कधी प्लास्टिक, कधी वायर तर कधी काचांपासून तयार केलेला ड्रेस परिधान करते. तिच्या या लूकची चर्चा सोशल मीडियावर होते. उर्फी ही तिच्या अतरंगी स्टाईलमुळे देखील चर्चेत असते. बिग बॉस ओटीटीच्या पहिल्या सिझनमधून उर्फी प्रेक्षकांच्या भेटीस आली. या शोमुळे तिला लोकप्रियता मिळाली.

# भावा-बहिणीनं एकत्र पहावा, असा सिनेमा!



हा चित्रपट 10 नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचे एक खास स्क्रिनिंग पार पडले. या स्क्रिनिंगला अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली. नाळ-2 या चित्रपटाचं स्क्रिनिंग पार पडल्यानंतर अनेक कलाकारांनी या चित्रपटाच भरभरुन कौतुक केलं आहे. हा चित्रपट दिवाळीत आपल्या भावा-बहिणीसोबत नक्की बघा, असं अनेक कलाकारांनी प्रेक्षकांना सांगितलं आहे. अभिनेता प्रियदर्शन जाधवनं नाळ-2 या चित्रपटाचं कौतुक केलं आहे. तो म्हणाला, "चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन, इतका गोड, निरागस सिनेमा खूप वर्षांनंतर पाहिला. दिवाळी, भाऊबिजेला तुमच्या कुटुंबासोबत हा चित्रपट नक्की बघा!" प्रथमेश परब म्हणला, "दिवाळीची सुट्टी आहे. दिवाळीच्या सुट्टीत घरी फराळ असतो. त्यामध्ये गोड पदार्थ असतात. पण जर तुम्हाला गोड चित्रपट बघायचा असेल तर तुम्ही नाळ-2 हा चित्रपट थिएटरमध्ये जाऊन नक्की बघा. मला वाटतं की तुम्ही जर हा चित्रपट बहिणीसोबत पाहिला तर तुम्हाला हा नक्की रिलेट करेल." स्मिता तांबेनं नाळ-2 चित्रपटाबद्दल सांगितलं, "हा एक अप्रतिम अनुभव आहे. हा चित्रपट भाऊबिजेची खरी ट्रीट आहे, असं म्हणता येईल. हा चित्रपट भाऊ आणि बहिणीनं एकत्र जाऊन बघावा. संपूर्ण कुटुंबानं हा चित्रपट बघावा. चित्रपट बघताना असं वाटतं एका गावात चुकून कॅमेरा गेला आहे. चित्रपटात खूप हळव्या भावना आहेत. " सुधाकर रेड्डी यक्कंटी यांनी नाळ-2 या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. जितेंद्र जोशी, श्रीनिवास पोकळे दीप्ती देवी आणि नागराज मंजुळे यांनी या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली आहे. 'नाळ' (NAAL) हा चित्रपट 2018 मध्ये रिलीज झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळाली.

# भारताचा नेदरलँडवर 160 धावांनी विजय

## » सलग नववा विजय मिळवत रचला इतिहास!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**गट फेरीतील शेवटच्या सामन्यात भारताने नेदरलँड्सचा 160 धावांनी पराभव केला. टीम इंडियाचा सामना पहिल्या सेमीफायनलमध्ये 15 नोव्हेंबरला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडशी होणार आहे. भारत या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित आहे. त्यांनी सर्व नऊ विरोधकांचा पराभव केला आहे. भारताने ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश, न्यूझीलंड, इंग्लंड, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्चा पराभव केला आहे.**



पॉइंट टेबलमध्ये टीम इंडियाचे 18 गुण आहेत. गट फेरीत संघाने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले.तर, नेदरलँड्सने विश्वचषक स्पर्धेतील आपला प्रवास गुणतालिकेत 10व्या स्थानावर संपवला. त्यांनी नऊ सामन्यांत दोन विजय मिळवले. तर, नेदरलँड्सला सात सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागले. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडियाने 50 षटकांत चार विकेट गमावत 410 धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्चा संघ 47.4 षटकांत सर्वबाद 250 धावांवर आटोपला. प्रथम फलंदाजी करताना श्रेयस अय्यर (नाबाद 128) आणि के. एल. राहुल (102) यांची शतके आणि रोहित शर्मा (51), शुभमन गिल (61), विराट कोहली (51) यांनी अर्धशतके झळकावून भारताला 4 बाद 410 अशी जबरदस्त धावसंख्या उभी करून दिली. भारताने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना नेदरलँड्सकडून तेजा निदामनुरूने सर्वाधिक 54 धावा केल्या. सायब्रँडने 45, कॉलिन अकरमन 35 आणि मॅक्स ओडाडने 30 धावा केल्या. कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने 17 धावा केल्या. लोगान व्हॅन बीक आणि रोएलॉफ व्हॅन डर मर्वे प्रत्येकी 16 धावा करून बाद झाले. बास डी लीडेने 12 धावा, आर्यन दत्तने पाच धावा आणि वेस्ली बॅरेसीने चार धावा केल्या. पॉल व्हॅन मीकरेन तीन धावा केल्यानंतर नाबाद राहिला. टीम इंडियाने दिवाळीच्या दिवशी चाहत्यांना विजयाची भेट दिली. 2003 च्या विश्वचषकात भारताने सलग आठ सामने जिंकले होते. नवव्या विजयासह त्याने यावेळी हा विक्रम मोडीत काढला. वर्ल्ड कपमध्ये सलग सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे. 2003 मध्ये त्याने 11 सामने जिंकले होते. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. रोहित शर्माने 11 पैकी नऊ खेळाडूंना गोलंदाजी दिली. केवळ केएल राहुल आणि श्रेयस अय्यर यांनी गोलंदाजी केली नाही. संघाचे वरिष्ठ खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी प्रत्येकी एक विकेट केली. तर, शुभमन गिल आणि सूर्यकुमार यादव यांनाही गोलंदाजीची संधी मिळाली. भारताकडून मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. मोहम्मद शमीला या सामन्यात एकही यश मिळाले नाही. टीम इंडियाचा सामना आता पहिल्या उपांत्य फेरीत १५ नोव्हेंबरला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडशी होणार आहे. भारत या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित आहे. त्यांनी सर्व नऊ संघांचा पराभव केला आहे. भारताने ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश, न्यूझीलंड, इंग्लंड, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्सचा पराभव केला. गुणतालिकेत टीम इंडियाचे १८ गुणांसह अव्वल स्थानी आहे. दुसरीकडे, नेदरलँड्सने विश्वचषकातील आपला प्रवास तळाच्या १०व्या स्थानावर संपवला. नेदरलँड्सला नऊ सामन्यांत दोन विजय मिळवता आले आणि सात सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवानंतर नेदरलँड चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

### निदामनुरूची 54 धावांची खेळी

» लक्ष्याचा पाठलाग करताना सातव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या तेजा निदामनुरूने नेदरलँड्सकडून सर्वाधिक ५४ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याच्या बॅटमधून सहा षटकार आणि एक चौकार आला. तेजा नंतर, संघाचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा सिब्रांड एंजेलब्रेक्ट होता. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना एंजेलब्रेक्टने ४५ धावा केल्या. या दोन फलंदाजांव्यतिरिक्त तिसऱ्या क्रमांकावर खेळताना कॉलिन अकरमनने ३५ धावांचे योगदान दिले. राट कोहली आणि रोहित शर्मानेही गोलंदाजी करताना १-१ विकेट घेतली. त्याचबरोबर बुमराह, सिराज, कुलदीप आणि जडेजाने २-२ विकेट्स घेतल्या.

# इंग्लंड क्रिकेट संघातील ९ खेळाडूंना बाहेरचा रस्ता!

## » वेस्ट इंडिजच्या मर्यादित षटकांच्या दौऱ्यासाठी संघाची घोषणा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडच्या संघाने क्रिकेटप्रेमींची निराशा केली. या संघाची स्पर्धेतील कामगिरी अत्यंत सुमार ठरली. याची गंभीर दखल घेत इंग्लंडच्या निवड समितीने वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी विश्वचषक संघातील ९ खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवला आहे.**



इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ECB) वेस्ट इंडिजच्या आगामी मर्यादित षटकांच्या दौऱ्यासाठी संघाची घोषणा केली आहे. गतविजेत्या T20 विश्वविजेत्या संघाला 3 डिसेंबरपासून तीन एकदिवसीय सामने आणि पाच T20 आंतरराष्ट्रीय सामने खेळायचे आहेत. इंग्लंडचा कॅरेबियन दौरा 3 डिसेंबरपासून सुरू होत असून हे सामने 21 डिसेंबरपर्यंत खेळवले जाणार आहेत. निवड समितीने एकदिवसीय मालिकेसाठी १५ सदस्यीय इंग्लंड संघाची घोषणा केली आहे, टी-20 संघात 16 खेळाडूंचा समावेश आहे. वेगवान गोलंदाज जोश टॉंग आणि जॉन टर्नर यांना एकदिवसीय आणि टी-20 दोन्ही संघात स्थान मिळाले आहे. भारतातील सध्याच्या विश्वचषक इंग्लिश संघाचे एकूण सहा खेळाडू कॅरेबियन दौऱ्याचा भाग असणार आहेत. विश्वचषक स्पर्धेत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या जॉनी बेअरस्टो, जो रूट आणि मार्क वुड या ऑफ फॉर्म खेळाडूंना दोन्ही संघात स्थान मिळाले नाही, तर डेव्हिड विलीने नुकतीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेनंतरही इंग्लंडने जोस बटलरला कर्णधारपदी कायम ठेवले आहे. विश्वचषक लीग टप्प्यात सातव्या स्थानावर राहिल्यानंतर कर्णधार आणि मर्यादित षटकांचे प्रशिक्षक मॅथ्यू मॉट यांच्यावर प्रचंड दबाव आहे. त्याच्या देखरेखीखाली हा संघ 2025 च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी केवळ पात्र ठरला आहे. पाकिस्तानविरुद्धचा सामना इंग्लंडसाठी आपला शेवटचा सामना असू शकतो, असे नुकतेच जाहीर करणाऱ्या डेव्हिड मलानला दोन्ही संघात स्थान मिळाले नाही. इंग्लंड संघात मोईन अली, ख्रिस वोक्स, रीस टोपली आणि आदिल रशीद यांसारख्या वरिष्ठ खेळाडूंना एकदिवसीय संघात स्थान मिळालेले नाही;परंतु ते T20 संघाचा भाग आहेत. इंग्लंडच्या वेस्ट इंडिज दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने होणार आहे. 12 डिसेंबरपासून ब्रिजटाऊन, सेंट जॉर्ज आणि तारुबा येथे पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेला सुरुवात होईल.

### इंग्लंडचा वन-डे संघ

» जोस बटलर (कर्णधार), रेहान अहमद, गुस ॲटकिन्सन, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, जॅक क्रॉ, सॅम करन, बेन डकेट, टॉम हार्टले, विल जॅक्स, लियाम लिव्हिंगस्टोन, ऑली पोप, फिल सॉल्ट, जोश टंग आणि जॉन टर्नर . इंग्लंडचा T-20 संघ : जोस बटलर (कर्णधार), रेहान अहमद, मोईन अली, गुस ॲटकिन्सन, हॅरी ब्रूक, सॅम कुरन, बेन डकेट, विल जॅक, लियाम लिव्हिंगस्टोन, टायमल मिल्स, आदिल विरशीद, फिल सॉल्ट, जोश टंग, रीस टोपली, जॉन टर्नर आणि ख्रिस वोक्स.